मासिकांक ११

दिनांक: १६ फेब्रुवारी २०२२




# "ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अंतरंग


३ प्रस्तावना
सायली देशपांडे

५ दोन शब्द
वादिराज विनायक लिमये

७ कुमार
संजीवनी मराठे

८ माझ्या प्रेमाचा अनुभव
संध्या दुर्गे

१२ गुंतता हृदय हे
भार्गवी बाबरेकर

१५ ही कुणी छेडली तार
प्राजक्ता बर्वे

१८ ...तुमचं आमचं सेम नसतं
स्वर्णिमा प्रकाश

२३ प्रेम दृष्टी
अपूर्वा भालेराव

२५ तुझियासवे...
तृष्णा आंबेकर

२८ समारोप
सायली देशपांडे


"ती"चं पान
तिच्याकडून मनाळ्यांसाठी

# प्रस्तावना

फेब्रुवारी महिना म्हंटला की आवर्जून आठवतो तो प्रेम सप्ताह,प्रेम दिवस..! पण या एकाच गोष्टीपुरता हा महिना मर्यादित नाही. तर याबरोबरच येतो तो मराठी भाषा दिन..! आपल्या लाडक्या कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस.

मराठी साहित्य विश्वात शिरवाडकर म्हणजेच मराठी भाषा असं जणू समीकरणच निर्माण झालं आणि आजही तसंच आहे. भाषा माणसाला समृद्ध करते. मग ती कुठलीही असो. पण ज्याप्रमाणे आई जास्त जवळची असते तसेच आपली मातृभाषा आपल्या जास्त जवळची. अर्थातच मराठी. या मराठी भाषेत असंख्य कवी, कवयित्री होऊन गेलेत. त्यांनी काय शिकवलं तर भाषेवर प्रेम करायला शिकवलं. त्यातलं सौंदर्य बघायला शिकवलं. उगीच नाही प्रेम दिवस म्हंटला की आधी ' प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं' ही पाडगावकरांची कविता ओठी येते!!

अगदी पिढी कुठलीही असली तरी प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं असं म्हणत आपल्यातला कवी, कवियत्री जागी होते.या कवितेच्या विश्वातील एक प्रेमयुगच जणू काही या सगळ्या मान्यवरांनी निर्माण केलं. हे सगळं असतांना प्रेम हे फक्त तिच्यावर किंवा त्याच्यावरच करावं का? असा प्रश्न निर्माण झाला तर माझ्यापुरतं तरी याचं उत्तर नाही असं असेल. मराठी भाषा दिन यादिवशीच फक्त मोठमोठी भाषणं देऊन एक दिवसाचं प्रेम न व्यक्त करता आपली मातृभाषा कशी जपल्या जाईल, तिचं जतन आपण कसं करू शकतो याबद्दल विचार करून तो प्रत्येकाच्या मनात रुजवणं आपल्या भाषेबद्दल प्रेम निर्माण करून तिचा आदर करणं हे सुद्धा एका प्रेम दिवसापेक्षा नक्कीच कमी नाही.

भाषा,देश याहीपेक्षा मोठं म्हणजे राष्ट्र. आपली संस्कृती आपल्याला शिकवते की

विचार या व्यापक असावा,विशाल असावा. मग या न्यायाचे पालन करून राष्ट्रप्रेम केलं तरी ते उत्तमच..! ती चं पान च्या या अंकात 'प्रेम' या संकल्पनेला मध्यवर्ती ठेवत कुठे छान छान प्रेमकवितांचा आधार घेत छान लिखाण केलंय, कुठे प्रेम कविता आहे, एकंदरीतरच प्रेमाचा ऋतू यात शब्दांनी फुललेला तुम्हाला वाचता येईल.

या अंकात "दोन शब्द" या मथळ्यात वादिराज लिमये यांनी आपल्या सुंदर लेखनशैलीत जे शब्दबद्ध केलंय ते वर्णनातीत आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार..! हा अंक सर्वांगसुंदर करणाऱ्या श्री अक्षय देशपांडे यांचे सुद्धा आभार.! हा अंक आपल्याला नक्की आवडेल अशी आशा व्यक्त करते आणि माझ्या लेखणीला विराम देते.

सगळ्यांना प्रेम दिवस आणि मराठी भाषा दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा...!

- सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द - वेद आणि ती...

"ती"चं पान या स्त्रियांनी स्त्रियांसाठी स्त्रियांना केंद्रस्थानी ठेऊन सुरू केलेल्या उपक्रमात एका पुरूषाने दोन शब्द लिहावेत हे एक अवघड काम आहे किंबहुना अशावेळी पुरूष खरोखरीच दोन शब्दच बोलू शकेल. विनोद जाऊद्या परंतु या विश्वाविषयी आजपर्यंत जो काही विचार आपल्या पूर्वासुरींनी केला त्यात पुरूष आणि स्त्री या दोनही तत्त्वांना महत्व दिल्याचे आपल्याला आढळेल. तत्त्वज्ञानिक मतापासून (दर्शने) ते तांत्रिक अशा शैव-वैष्णवांपर्यंत प्रकृती-पुरुष, ईश्वर-शक्ती अशा संज्ञांनी स्त्री-पुरुष तत्त्वांचा विचार केला गेला म्हणजेच या विश्वाला त्या दोन तत्त्वांपासून वेगळे करता येऊ शकत नाही.

आपल्या भारतीय सनातन संस्कृतीला पुरूषप्रधान म्हणतात, तसे तिचे व्यावहारिक स्वरूप आहेच परंतु त्यामध्ये स्त्रियांना स्थानच नाही असा आरोप अनेकदा अनेकांकडून होतो. पण या भारतीय संस्कृतीचा, तिच्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग असलेले वेद हे "अपौरूषेय" आहेत. म्हणजेच त्यांचा कोणी कर्ता नाही, पुरूष कर्ता नाही. त्याच वेदांना "श्रुति" असे म्हणतात. "ती" वेदश्रुति अशी स्त्री, "तो" अशा पुरूष कर्त्याशिवाय निर्मिली गेली आणि इतकेच नव्हे तर आज कित्येक कल्पे, युगे, ती एकटी हा सनातन संसाराचा गाडा हाकत आहे. तिच्याशिवाय कोणत्याही वैदिकाचे, धर्माभिमान्याचे पान हालत नाही असे ते खरेतर "त्याचे पान" आहे. एकटे स्त्री तत्त्व काय करू शकते हेच जणू आपल्या परंपरेने दाखवून दिले नाही?!

मग एखादा वेदांती हा त्या वेदांचा विचार करता-करता त्यात त्याच्या प्रेयसीला पाहायला लागला अन् प्रेयसीत त्या वेदांताला पाहू लागला. मग काय घडले तर त्या वेदांतात त्याला तिचे दर्शन झाले अन् तिच्यात त्या वेदांताचे दर्शन झाले त्याचाच थोडक्यात घेतलेला हा मागोवा.

या विश्वात माणसाचा मेंदू सतत सक्रिय ठेवण्यासाठी ज्या काही गूढ अगम्य गोष्टी अस्तित्वात आहेत त्यात वेद म्हणजे तत्त्वज्ञान आणि ती म्हणजे प्रेयसीच पण तुम्ही दैववादी असाल तर नियती म्हणा, तंत्रमार्गी असाल तर शक्ती म्हणा, हरकत काहीच नाही तर या दोन गोष्टींचा क्रमांक वरच्या स्थानी लागतो.

मला तर तत्त्वज्ञानाने आणि तिने शहाणं करायचा मक्ताच घेतला होता. या दोघांनीही मला अक्षरशः रस्त्यावर आणलं, शहाणपणाच्या! आपल्याला काहीही कळत नाही हे कळणं या वेडेपणाला अध्यात्म-तत्वज्ञानाच्या प्रांतात शहाणपणा म्हणतात. दोघांनी सुरूवातच केली ती "नेति नेति" म्हणत! तुझ्या डोक्यात आजपर्यंत ज्या काही कल्पना आहेत तसं काही नाहीचे मुळी! हेही दोघांनी अनेकदा न बोलताच सांगितलं. कारण दोघांना अनिर्वचनीयता माझ्याहून अधिक प्रिय होती. मग या सगळ्यात तर्काने जरा डोकं वर काढायला घेतलं तर "नैषा तर्केण मतिरापनेया ।" म्हणत दोघांनीही मला गप्प केलं. मग उरलं काय? फक्त प्रश्न...! हे दोघांनाही प्रिय. सगळ्या प्रश्नांची उत्तर मिळाल्यावर शेवटी उरणारं जे प्रश्नचिन्ह आहे तेच मी असं दोघांनीही ठणकावून सांगितलं. आजही त्या अनुत्तरीत प्रश्नांची उत्तर मिळवत त्या शेवटच्या प्रश्नचिन्हाच्या शोधात आहे. पण एक सांगू, वेद असोत वा ती, जोपर्यंत या दोघांना आपणहून एखाद्यापुढे व्यक्त व्हावं असं वाटत नाही तोपर्यंत केवळ मला समजून घ्यायचंय म्हणून ते समजत नाहीतच आणि हे माहित असूनही त्यांना समजून घेणं सुटत नाही हाच तो शहाणपणातला वेडेपणा...!

- वादिराज विनायक लिमये

# कुमार

दूरदेशीचा कुणी वसला मनात माझ्या
प्रीतीचे चांदणे फुलले अंगणात माझ्या
गुलाबी गुलाबाचा गंध दरवळतो
शहारून गारव्याने तो पुलकित होतो
धुक्याचा अंडसर गंध गारव्यात साध्या
दूरदेशी चा कुणी वसला मनात माझ्या
प्रांतात त्याच्या बिलगती वृक्ष पर्वतांना
संगीत-सरितेचे अन् ताल निर्झरांचा
चांदण्यात भास आहे प्रीतीचा तुझ्या
दूरदेशी चा कुणी वसला मनात माझ्या
घर माझे मला ,आज का खुणावते ?
सलज्ज मी उगा स्वतः शीच हासते
थबकली पाऊले माझी माझ्याच घरा,
दूर देशी चा कुमार बघता अंगणात माझ्या....

- सई मराठे



"ती"चं पान
तिच्याकडून मनाळ्यांसाठी

# माझा प्रेमाचा अनुभव

प्रीती सहनशील आहे ,

उपकारशील आहे,

प्रीती हेवा करीत नाही,

प्रीती बढाई करीत नाही,

फुगत नाही,

अनुचित पणे वागत नाही ,

स्वहित पहात नाही,

चिडत नाही

आपणा सर्वांना वसंतोत्सव, प्रेम दिवसाच्या अगणित शुभेच्छा!

माझ्याही आयुष्यात असेच भरभरून प्रेम मला मिळाले आहे त्याची आपल्याला ही माहिती व्हावी, जरी त्या सर्वांच्या ऋणात राहू इच्छित असले तरीही कधी Thank You म्हणून त्यांच्या प्रेमाची त्यांना पावती द्यावीच, असे वाटते म्हणून हा लेख आणि अनुभव कथन प्रपंच .

आयुष्याची अर्धी वर्ष संपली म्हणून आता हे लिहायची वेळ आली असे वाटते .

सर्वात प्रथम माझ्यावर प्रेम करणारा आहे माझा देव! (मी फार आस्तिक नाही हो पण तरीही नकळत देवावर भरवसा ठेवते) त्याने मला लहानपणापासून, अगदी जन्मापासूनच सगळं छानच दिलंय.

प्रेमळ, कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आई-वडील, तेवढ्याच प्रामाणिक पणें व सचोटीने वागणारे



"ती"चं पान
तिच्याकडून मनाळ्यांसाठी

भाऊ-बहीण, चांगले शिक्षण,व ते देणारे उत्तमोत्तम शिक्षक, मित्र आणि मैत्रिणी, लग्न झाल्यावर अतिशय प्रेमळ, सतत मदत करणारे आणि प्रोत्साहित करणारे पती आणि सज्जन व हुशार मुले. म्हणावे तर घेतलेल्या शिक्षणामुळे मिळालेली नोकरी अर्थात आर्थिक स्थैर्य, मिळालेल्या नोकरीमुळेच विविध पीडितांची सेवा करण्याची संधी ,हे सगळे आणि अजूनही बरेच काही देवाने माझ्या प्रेमा खातरच मला दिलय. त्यामुळे देव माझ्यावर प्रेम करतोच करतो याची मला खात्री आहे.

पण तरीही कुठेतरी मी त्याला आवडत नसावे असेही मला वाटते, कारण कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मोठे आजारपण असूनही त्याने मला त्याचेकडे येऊच दिले नाही हो! आणि कदाचित पुढचे नवीन काही कर्तव्य करावे इथेच ठेवले आणि माझ्या वरील प्रेमाखातर तो मला मदत करतोच आहे. हे ईश्वरा! तुझे आभार!

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत खूप जणांनी आपले आईवडील गमावले, आप्त गमावले. त्यावेळी आमचे घरातील आम्ही तीन सदस्य पॉझिटिव्ह आलो. आणि माझी मोठी मुलगी व मुलगा दोघेही negative आले. त्या परिस्थितीत जवळपास पंधरा सतरा दिवस आम्ही विलगी करणात होतो. ट तेव्हा मुलांनीच आमचे करीता जेवण खाण, औषधोपचार, काढे करणे अशी जवळपास २४ तास आमची काळजी घेतली. हे आमच्या प्रेमाखातरच ना !

मी जवळपास आठ दिवस रुग्णालयात ॲडमिट होती. त्यावेळी माझे पती, मुले, सासुबाई ,माझी बहीण, भाऊ या सगळ्यांनी माझी काळजी केली, काळजी घेतली, मला फोन करून का होईना सपोर्ट केला, हे माझ्या प्रेमाखातर याची मला खात्री आहे.

असेच मला सपोर्ट करणारे माझे बरेच नातेवाईक, अगदी शाळा, कॉलेज आणि ऑफिसच्या सहकारी मित्र मैत्रिणी घरा जवळच्या मैत्रिणी या सगळ्यांनी प्रत्यक्ष मदत करून किंवा फोन वरून मला धीर देऊन ,बोलून मदत केली कारण हे सगळेच माझ्यावर खूप प्रेम करतात. आणि या आजारपणात अगदी माझी खात्री पटली आहे .

माझ्यावर प्रेम करणाऱ्या आणखी बऱ्याच व्यक्तींपैकी तिघीजणीचे खास आभार मानायचे आहेत.या तिघी आहेत माझ्या रुग्ण भगिनी किंवा मैत्रिणी. मी त्यावेळी

प्रादेशिक मनोरुग्णालयात कार्यरत होती .त्या तिघी माझ्याकडे उपचाराकरता, काहीही मदत लागली तर भेटायला येतात आणि बऱ्याच वर्षांपासून त्यांची माझी ओळख आहे. मला त्यातील दोघींचे इतर वेळीही फोन येतात. हालहवाल त्यांचा आणि माझा विचारला जातो, आणि महिन्या दोन महिन्यात प्रत्यक्ष भेट होत असे. परंतु कोरोना, लॉकडाऊन या काळात प्रत्यक्ष भेट कमीच झाली होती. त्या दिवशी दोघीजणीं चे फोन आले तर त्यांना, "मी बरं नसल्याने सुट्टीवर आहे" असे सांगितले.

तिथून जवळपास दररोज किंवा एक दिवसाआड त्यांचे मला," तब्येत कशी आहे?" हे विचारणारे फोन येऊ लागले.एकीने मला बरे वाटावे म्हणून रोज देवाला प्रार्थना केली, आणि दुसरीने तर दररोज बंद देवळासमोर जाऊन प्रार्थना केली. मी हॉस्पिटल ला ॲडमिट झाल्याचे कळताच ,"मॅडम घाबरु नका," तुम्हाला काही होणार नाही .आम्हाला आमच्या सारख्या बऱ्याच लोकांना तुमची अजूनही गरज आहे, त्यामुळे तुम्ही लवकरच व्हाल" असा धीराचा सल्ला दिला आणि डॉ जे ते सगळं नक्की करा.औषध व्यवस्थित घ्या" असा मीच त्यांना कधीतरी दिलेला सल्ला प्रेमळपणे मला परत केला .

त्यानंतर मी घरी आले आणि पुढे रजा संपवून कामावर गेली, तेव्हा त्या दोघीही आवर्जून प्रत्यक्ष भेटायला आल्या .आणि पुनश्च मला ," अजूनही तब्येतीची काळजी घ्या, स्वतःला जपा आणि आमच्या सेवेला तयार राहा!" असा धमकीवजा सल्लाही दिला .

अशा माझ्या माझ्यावर प्रेम करणाऱ्या जिवलग मैत्रिणी आहेत म्हणून मी स्वतःला धनवान समजते.तिसऱ्या माझ्या मैत्रिणीने माझ्या तब्येतीला आराम पडावा म्हणून, प्रार्थने सोबतच अन्नदान संकल्प केला. अशा मैत्रिणी असल्याने मला गहिवरून येते.

माझ्या पतीची बॅचमेट आता माझी पण झालेली मैत्रीण तिनेदेखील आम्हा सर्व कुटुंबीयांचे स्वास्था करिता जप अनुष्ठान केले. तसेच माझ्या घरी स्वयंपाकाला असणारी ताई आणि ऑफिस बॉय यांनी देखील डब्बा देणे आणि इतर भरपूर सेवा केली .म्हणून अशा सगळ्यांचे माझ्यावर असंख्य उपकार आहेतच.



म्हणून वर म्हटल्याप्रमाणे , मला मिळालेले प्रेम सहनशील आहे, उपकारशील आहे.

तरी ते बढाई मारत नाही आणि स्वहित पाहत नाही .

अशा सर्वांकडून प्रेम मिळाल्याने माझा प्रेम दिवस हा खास होतो आहे आणि होतच राहणार! कारण मी त्यांच्या प्रेमळ ऋणातच राहणार असे ठरविले आहे.

- संध्या प्रकाश दुर्गे

# गुंतता हृदय हे...!

एकेक कमलदल उमलावं तशी ती खुलत होती, फुलत होती. तिच्या भावनांना एक प्रवाह होता त्या दिवशी. इतर वेळी प्रत्येक गोष्टीची घाई करणारी मधुरा आज मात्र संयमाच्या पारड्यात होती. माधवला यायला आज जरा उशीरच झाला होता. पण वाट बघायला मधुराची काहीच हरकत नव्हती. थोड्या वेळातच माधव आला. मधुरा जागीच उभी झाली.

" हाय मधुरा! सॉरी हं...मला जरा उशीरच झाला. खूप वाट बघावी लागली ना तुला! एका खूप महत्त्वाच्या कामात अडकलो होतो ना. पण झालं ते काम आता..बस ना तू...अशी उभी नको राहुस!"

" हो हो...ये ना तू पण बस."

मधुरा आज विलक्षण सुंदर दिसत होती. तिचे ते बोलके डोळे खूप काही सांगत होते. वाऱ्याची झुळूक तिच्या केसांना गालापर्यंत आणत होती...आणि त्या केसांना मधुरा नाजूक हाताने अलवारपणे कानाच्या मागे नेत होती. हे सारं माधव त्याच्या डोळ्यात टिपून घेत होता.

मधुराने तिच्या प्रेमाची कबुली माधवला दिली होती. आता वेळ होती ते माधवने उत्तर कळविण्याची..! काही वेळ दोघंही गप्पच होते. मग माधवने जरा घसा खरवडला आणि बोलू लागला..

" अ...मधुरा मी आता सरळ विषयालाच हात घालतो बरं का! तुला का आवडतो ग मी? असं काय आहे माझ्यात? माझं दिसणं जर म्हणशील तर मी अगदीच average दिसतो..म्हणजे तसं बघायला गेलं तर माझ्याहून देखणा , रुबाबदार मुलगा तुला सहज मिळेल..

शिवाय तू किती सुंदर आहेस! आता पर्यंत भरपूर मुलांनी तुला विचारलंय मग तू माझीच निवड का केलीस?"

मधुरा हसली..

" बापरे माधव...किती ते प्रश्न! देईन मी. तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं देईन तुला! हे बघ दिसण्याचं म्हणशील तर माझा व्यक्तीच्या आंतरिक सौंदर्यावर जास्त विश्वास आहे. आणि कोणी सांगितलं तुला तू अगदीच average दिसतोस म्हणून? अजिबात नाही! आता तुझ्यात काय आहे हे मला माहीत नाही .पण हो.. तुझ्यात असं काही तरी नक्कीच आहे जे नेहमीच मला तुझ्या पर्यंत खेचून आणतं..."

माधव तिच्या कडे बघतच राहिला...तिच्या डोळ्यांमध्ये माधवला प्रचंड प्रेम दिसत होतं! माधव बद्दल बोलताना किंचित पाणावलेले तिचे डोळे बघून झटकन तिचा हात हातात घ्यावासा त्याला वाटत होता पण...

"हे बघ माधव मला बाकी काही माहित नाही. इतकं नक्कीच सांगेन की तू माझ्यासाठी काय आहेस हे तुला मी शब्दात सांगू शकत नाही! मी माझं प्रेम व्यक्त केलंय...आता वेळ आहे तुझ्या मनात काय आहे हे जाणून घेण्याची!"

एक दीर्घ श्वास घेऊन माधवने डोळे मिटले आणि बोलू लागला..

" मधुरा, मी तुला आता काही तरी सांगणार आहे. खूप दिवसांपासून तुला हे मला सांगायचं होतं पण बोलू शकलो नाही.."

मधुराची धडधड वाढत होती. ती जिवाचं रान करून माधवचे शब्द ऐकत होती..

" आपण दोघेही एकाच शाळेत होतो. हे तुला कदाचित माहिती नसेल. कारण इतर फारसं डेअरिंग नसलेल्या मुलांपैकी मी एक होतो! कधी पुढे येण्याची संधीच मिळाली नाही मला. पण तू मात्र मला तेव्हा पासूनच आवडायचीस. तुझं ते बिनधास्त असणं सगळ्या गोष्टींमध्ये अग्रेसर असणं हे सगळं मला खूप आवडायचं.. तुझ्या चेहेऱ्यावरचं ते गोड हसू कितीदा मला घायाळ करून जायचं. अश्यातच मी तुझ्या प्रेमात पडलो..पण बोलण्याची

हिम्मत कधी झाली नाही. Rather मी ती कधी केलीच नाही! शेवट पर्यंत वाटत होतं तू एकदा तरी माझ्याकडे बघशील पण तसं काही कधी मी केलंच नाही! हा..एक आहे मात्र! मनात असं सारखं वाटायचं, एक दिवस असा येईल की तू स्वतःहून तुझं प्रेम माझ्या समोर व्यक्त करशील. बघ तो दिवस आला! आता मात्र मी निःशंक पणे माझ्या मनातलं बोलू शकतो..."

मधुरा खळखळून हसू लागली..

" कसं असतं न माधव किती कमाल आहे हे! Seriously unbelievable!!"

"काय unbelievable?"

"तुला काय वाटलं? शाळेत असताना माझं तुझ्याकडे कधीच लक्ष गेलं नसेल? मी कधीच बघितलं नसेल तुझ्याकडे? अरे माझा एकही दिवस तुला बघितल्या शिवाय जायचा नाही! हं..आपली नजरानजर नाही झाली कधी. पण मी चोरून बघायचे तुला..आणि तुझ्या व्यक्त होण्याची वाट मी अगदी काल पर्यंत बघितली आणि शेवटी मीच घडाघडा बोलून गेले सगळं! माधव...कधी कधी आपल्याला वाटतं तेच खरं नसतं..."

माधव निःशब्द होता. त्याने त्याचा होकार डोळ्यांनीच कळवला होता. काही वेळ दोघेही तिथेच बसले...मौनात ! आणि प्रचंड प्रेम मनात साठवून परतीच्या वाटेवर निघून गेले...

- भार्गवी बाबरेकर

# ही कुणी छेडली तार

ए आईऽऽऽऽ बाय...... मी डबा घेतलाय.... आता पळते ऑफिसला जायला उशीर होतोय..... असं म्हणत जाई ऑलमोस्ट पळालीच, पण शेवटी व्हायचं तेच झालं.... बस चुकली. आता सगळीच गणितं बिघडणार म्हणून जाईची चिडचिड चालू झाली.... लागलीच तिने तिच्या कलिग्स ना कळवलं की उशीर होणार आहे आणि पुढच्या बस ची वाट बघत बसली.... आणि तितक्यात तो आला आणि त्याने विचारलं नऊ ची बस गेली नाही ना?

मोबाईल मध्ये डोकं खुपसून बसलेल्या जाईने वर बघितलं आणि तिला एकदम शॉकच बसला... "निषाद, तू इकडे?"..... तो जरा ब्लँकच झाला.... हिला आपलं नाव कसं माहित?.. "सॉरी, पण आपण ओळखतो का एकमेकांना?"... हे ऐकून जाईला जरा रागच आला... पण मग तो चेहऱ्यावर न येऊ देता ती बोलली- "हो, आपण एकाच वर्गात होतो दहावीपर्यंत! मी जाई.. जाई दिक्षित.".. निशांतला आठवलं आणि तो जरा ओशाळल्यासारखा झाला. "ओह!!! हाय जाई... सो सॉरी, मी जरा वेगळ्या टेंपरामेंट मध्ये होतो." एक साधारण जुजबी हाय-हॅलो केलं दोघांनीही आणि दोघंही आपापल्या बसमध्ये चढले. आत्ता घडलेला प्रकार जाईला जरा हळवं करून गेला.

तिला एकदम तिच्या दहावीचे दिवस आठवले. तशी ती जरा लाजरीबुजरीच होती पण निषाद कडे मात्र तिला बघत बसावं असं वाटायचं. तिकडे शिक्षक काही का शिकवेनात, हीचं लक्ष मात्र निषाद कडेच... एकेकाळी जो आपल्याला इतका आवडत होता त्याला आपण लक्षात सुद्धा नाहीये हे जाणवल्यावर जाईचा सगळा मूडच खराब झाला. ऑफिसमध्ये पण तिचं लक्ष म्हणावं तसं लागत नव्हतं.. त्यामुळे ती ऑफिस सुटल्या सुटल्या क्षणाचाही विलंब न करता घरी परतली.

सुट्टीचा दिवस असल्यामुळे जाई जरा आरामातच उठली आणि तिला आई नि भाजी आणायला धाडले... जरा कुरबुर करत ती गेली मार्केटला, तोच मागून आवाज आला- "अरे जाई!! हाय!!!"... तिने दचकून मागे बघितलं तर निशादच!... हा योगायोग समजावा की देवाची योजना असा विचार करत असलेल्या जाईला त्यानेच भानावर आणलं.... "हॅलोऽऽऽ मिस तंद्री बहाद्दर... कसला एवढा विचार करतेस?" जाईनी नकारार्थी मान हलवली... तसं निषाद पुढे बोलला- "अगं कालच्या बद्दल सॉरी... माझं ना, खरंच महत्त्वाचं प्रेझेंटेशन होतं नीट बोलू नाही शकलो... इथे जवळच एक मस्त साउथ इंडियन रेस्टॉरन्ट आहे तिकडे जायचं??? खाता खाता गप्पा पण मारता येतील."

जाई नी क्षणभर विचार केला.... आईला मेसेज पाठवला आणि ते दोघं निघाले... पाई पाई... रस्त्यावरून चालत असताना साधारण नगरपालिकेच्या कारभारामुळे आणि लोकांच्या अस्वच्छतेमुळे रस्ते कसे वाईट आहेत या विषयावर दोघांची चर्चा चालली होती.... तितक्यात समोरून एक टू व्हीलर वाला आला आणि तो जाईला धडकणार इतक्यात निषादनी तिचा हात पकडून तिला त्याच्या जवळ खेचलं... जाईला खरोखर कळेच ना.... आज काय चाललंय काय??? कारण त्याची ही रिएक्शन जरी नॉर्मल असली तरी त्यानंतर रेस्टॉरंटमध्ये जाईस्तोवर त्याने तिचा पकडलेला हात सोडलाच नाही... मग रेस्टॉरंट मध्ये पोहोचल्यावर त्यानी मसाला डोसा आणि तिने मेदुवडा ऑर्डर केला.... खाणं येईस्तोवर त्यांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या..... बऱ्याच विषयांवर चर्चा झाली.... जाईला तर अगदी सगळं नवखं नवखं, हवहवसं आणि तरी त्याला नॉस्टॅल्जिया ची झालं असल्यागत वाटत होतं.... खाऊन झाल्यावर ती उठून हात धुवायला जाणार इतक्यात त्याने तिला विचारलं... "जाई, कॉफी?"... तिने होकारार्थी मान डोलवली.

हात धूत असताना जाईला आतून सगळं कसं पाडगावकरांच्या कविते सारखं वाटत होतं...

मी करात माझा करा त्याचा घेऊनीया..

हिंडले स्वैर रंगांची पाहत दुनिया...

त्या रंगाहूनही अद्भुत सुंदर किमया...

घडवीत होती क्षणाक्षणाने हृदया...

परत आल्यावर पाहिले तर टेबलवर दोन फिल्टर कॉफी हजर होत्या आणि निषाद तिची वाट पाहत होता... मग परत त्यांच्या गप्पा सुरु झाल्या... कॉफी संपली पण गप्पा काही केल्या संपेना!! आणि तितक्यात तिला अगदी ओळखीचा आवाज जोराने आला.... अगं जाई... उठतेस ना?? क्षणार्धात जाई खाड्कन जागी झाली... तोच तिची आई उलतनं हातात घेऊन उभी होती... तिला काही कळतच नव्हतं.... शेवटी आई नी जाईला हलवलं आणि म्हणाली "अगं उठतेस ना??.. नाहीतर परत कालच्यासारखा उशीर होईल ऑफिसला जायला..."

जाई आत्तापर्यंत भानावर आली होती. तिला कळलं होतं की हे सगळं स्वप्न होतं... तिने पटापट सगळं आवरलं आणि वेळेच्या पाच मिनिटं आधी स्टॉप वर हजर झाली.... मोबाईलमधले मेसेज चेक करत असताना तिला परत तोच आवाज ऐकू आला... पण आज प्रश्न वेगळा होता... "हाय जाई... कशी आहेस... अगं सॉरी काल मी ब्लँक झालो... जरा वेगळे विचार चाललेले डोक्यात... तुला राग तर आला नाही ना?"... यावर जाईचा पूर्ण राग निवळला आणि तिने छानसं स्मितहास्य करत त्याला "नाही" असं उत्तर दिलं... मग तिच्या लक्षात आलं की अरेच्च्या!! काल तर हा नऊची बस पकडणार होता. रोज काही हा आपल्याला भेटत नाही.... मग आज कसा बरं लवकर आला... आणि तिनी न राहवून त्याला विचारलं.. "काय रे निषाद, आज लवकर जायचंय का ऑफिसला?" त्यावर जरासं ब्लश करून निषाद म्हणला "हो... पण आज नाही... आज पासून लवकर जायचंय"!!!!

- प्राजक्ता बर्वे

# ...तुमचं आणि  आमचं सेम नसतं

फेब्रुवारी महिना सुरू होताच आपल्या सगळ्या युवकांना चाहूल लागते ती valentine's week ची आणि valentine's day ची. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला जरा स्पेशल वाटाव म्हणून सगळेच खूप प्रयत्न करत असतात.  कारण valentine's day च्या निमित्ताने आपल्या मनात समोरच्या व्यक्तीबद्दल असलेल्या प्रेमाच्या भावना आपण व्यक्त करतो.

आपल्या सगळ्यांसोबतच काही गोष्टी नकळतपणे,  अनपेक्षितपणे पहिल्यांदाच घडत असतात आणि आपल्या आयुष्यात 'मज्जाच' येते! म्हणजे प्रत्येकच गोष्ट पहिल्यांदा घडतांना ती आपण मुद्दामच करतो असं नाही,  पण काही काही गोष्टी आपोआप घडतात आणि आपोआप घडण्यात जी मजा असते ना ती सांगून कळत नाही आणि विचारून समजत नाही!

प्रेमाचंही काहीसं असंच आहे असं मला वाटतं.  म्हणजे सहसा कोणी असं ठरवून प्रेमात पडत नाही हे तर आता आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे. खरंतर,  "प्रेम" हा छोटासा अडीच अक्षरी शब्द,  पण तरीही मनाच्या आभाळाला पुरून उरणारा आहे! प्रेमात पडल्यावर आपलं जग इतरांच्या जगापेक्षा वेगळं आहे असं वाटू लागतं. या जगात सगळ्या दुःखांना नाहीसं करण्याची ताकद आहे असं आपण समजतो.

"असता समीप दोघे हे ओठ मूक व्हावे
शब्दाविना परंतू बोलून सर्व जावे।
अतृप्त मिलनाचे, विरहातही सुखाचे
विश्वाहुनी निराळे हे विश्व प्रेमिकांचे !।।"

ज्येष्ठ कवयित्री "शांताबाई शेळके" यांच्या या ओळी प्रेमात पडलेल्यांचं जग वेगळंच असतं याची जणू नकळत ग्वाहीच देत आहेत असं म्हणायला हरकत नाही. असं म्हणतात प्रेमात पडल्यावर आपल्याला काहीच सुचत नाही..मन कुठेतरी गुंतून पडतं..कुठल्याच गोष्टीत मन लागत नाही..आपण स्वतःशीच बडबडतो..पोटात कधीतरी अचानक गोळा येतो..आणि सोबतच मानत " कुछ कुछ होता है" च्या भावना निर्माण होतात.. तिच्या स्वप्नात राजकुमार येतो तर त्याच्या स्वप्नात राजकुमारी. आणि तेव्हा आपण कोणाच्या तरी प्रेमात पडलो असून आपल्या आयुष्यात "कुछ कुछ नही" तर "बहोत कुछ हुआ है" याची जाणीव आपल्याला होते.

प्रेम ही संकल्पना माणसाच्या आयुष्यात आनंद घेऊन येते. तेव्हा त्या संकल्पने सोबतच असावं, तिच्यासोबतच जगावं आणि तिच्यासोबत मारावं अशी प्रत्येकाच्याच मनात इच्छा असते. जगात किंवा नात्यात जोपर्यंत प्रेम आहे तोपर्यंत ते सुंदर आहे. हृदयापासून घातलेली साद पोहोचलीच पाहिजे ही प्रेमाची अट म्हणता येईल, आणि मग जाणीवेतून नित्यच व्यक्त होणारं प्रेम हे शब्दातून व्यक्त करणं तितकसं आवश्यक वाटणार नाही. समोरील व्यक्तीच्या हृदयाचा ठाव न घेता व्यक्त केलेल्या प्रेमात देण्याऐवजी घेण्याची किंवा मिळवण्याची इच्छा अधिक असते. आणि त्याहीपलीकडे जाऊन जर त्या नात्यास काही भविष्य नसेल तर 'अव्यक्त' प्रेमच उत्तम असं म्हणायला हरकत नाही. कारण जबाबदारी शिवाय केलेलं प्रेम आणि आणि जबाबदारी शिवाय घेतलेला आनंद म्हणजे निव्वळ विकृतीच!

प्रेमात असतांना वेगळ्याच विश्वात असल्यासारखं वाटतं. आपल्या आवडत्या व्यक्तीच्या सहवासात असतांना ही वेळ कधी संपूच नये असं वाटतं. कारण भावनांना शब्द होऊन ओठांवर येण्यास मनाई असली तरीही मनातलं ओळखण्याची ताकद त्यात नक्कीच आहे!

"आहे - नाही, कसं - किती , काही कळत नसतं ।
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं ॥
रस्ते असतात साधे सरळ पाऊल फक्त फसतं ।

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं ॥
असता असता विरत जातं विरता विरता उरतं ।
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं ॥
खूप काही घडल्यानंतर शांत नितळ हसतं ।
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं॥"

प्रेम या भावनेला अनेक पदर आहेत. प्रत्येक पदराला 'तलम' आणि 'तरल' असे अनेक सूक्ष्म पापुद्रे आहेत. प्रत्येक पापुद्रा 'अलवार', 'नाजूक'. प्रत्येक पापुद्रा 'वेगळा' तरी 'एकसंघ'!

'प्रेम आणि वासना', 'प्रेम आणि नैतिकता' , 'प्रेम आणि व्यक्तिस्वातंत्र्य' , असे अनेक पैलू आहेत याचे. याकडे तटस्थपणे पाहता येईल अशी अलौकिक दृष्टी हवी आणि सामाजिक भानही, आणि हे सामाजिक भान आपणच जाणायला आणि जपायला हवं. प्रेमाची अशी कोणतीही ठरावीक परिभाषा नाही. खरं-खुरं प्रेम तर केवळ शब्दात व्यक्त करणं अशक्यच..पण तरीही आपण प्रयत्न नेहेमीच करतो...नाही का? लेखक, कवी आपलं प्रेम शब्दात व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात..बऱ्याचदा ते साध्यही होतं. तर कधी कधी डोळ्यांची भाषा सर्व काही बोलून जाते, शब्दांची गरजच पडत नाही.

बऱ्याचदा आपलं त्या व्यक्तीशी वर्तनही आपलं प्रेम उघड करतं आणि समोरची व्यक्ती आपण न उच्चारलेले शब्दही आपसूकच समजून घेते. पण, आपलं प्रेम व्यक्त करणं, प्रेमाचे चार शब्द बोलणं समोरच्या व्यक्तीला आनंद देऊन जातं आणि त्या नात्याची वीण आणखीन घट्ट होते. त्याचप्रमाणे कित्येकदा एखाद्या व्यक्तीचं काहीही न बोलता केवळ आपल्या शेजारी शांत बसून राहणंही आपल्याला खूप काही देऊन जातं. चांगल्या - वाईट दिवसात याच व्यक्तींची सोबत आपल्यासाठी सर्वात महत्वाची ठरते. पण हल्लीच्या काळात भावनेनं एकमेकांशी जोडलं जाणं आणि शारिरीक आकर्षण यातला फरक समजून न घेता, प्रेम ही संकल्पना समजून न घेताच आपण प्रेम करतो की काय अशी शंका निर्माण होते. कारण सहज, पाहताक्षणी प्रेमात पडणं हे जास्त घडतांना

दिसतं. . पण काय हे खरंच प्रेम आहे? की नुसतं शारिरीक आकर्षण? याचा आपण विचारच करत नाही.

असं म्हणतात नात्यांची मजा ती हळू हळू उलगडण्यात असते. "प्रेम" हा शब्द 'विश्वास' आणि 'त्याग' या दोन संकल्पनांशी निगडीत आहे. प्रेमात नातं हे विश्वासानं घट्ट होतं आणि तसंच ते परिपक्व आणि परिपूर्ण होत जातं.

प्रेम प्रत्येकच व्यक्ती करते, पण आपल्याला निरपेक्ष प्रेम करता आलं पाहिजे. प्रेम हा कुठल्याही प्रकारचा व्यवहार नसून एक प्रकारचा असा आनंद आहे ज्यात दुसऱ्याच्या आनंदात आपण आनंदी होतो.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक "वि. स. खांडेकर " त्यांच्या "ययाती" या कादंबरीत प्रेमाविषयी बोलतांना असं म्हणतात की "प्रेम किंवा प्रीती एका हृदयापासून उगम पावणारी आणि दुसऱ्या हृदयाला जाऊन मिळणारी महानदी आहे. वाटेत कितीही उंच डोंगर येवोत त्यांना वळसा घालून ती पुढे वाहत जाते. ज्या दिवशी कुठलंही माणूस आपलं होतं, त्याच दिवशी त्याच्या गुणांचा नी अवगुणांचा मनुष्याच्या मनातला हिशोब संपतो. मग मागे राहते ती केवळ निरपेक्ष प्रीती! अडखळत, ठेचाळत, धडपडत, पुनःपुन्हा पडत, पण पडूनही भक्तीच्या शिखराकडे जाण्याचा प्रयत्न करणारी प्रीती!"

त्यामुळे जेव्हा आपण समोरच्याच्या आनंदासाठी स्वतःला न आवडणारी ही गोष्ट हसत हसत करू तेव्हाच ते खरं प्रेम असेल असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही. एखाद्या ठरावीक कृतीवर एखादी ठरावीकच प्रतिकृती घडत असते. पण प्रेमाच्या बाबतीत तसं घडत नाही. कारण प्रेम हे मनातून निर्माण होतं आणि मन हे फार चंचल असतं.

ठरावीक परिस्थितीत जो विचार आपण करतो तो विचार समोरचीही व्यक्ती करेल असं सहसा होत नाही, म्हणून प्रेमात कोणाला गृहीत धरू नये. कारण गृहीत धरणं म्हणजेच एखाद्याच्या स्वातंत्र्यावर ताबा मिळवण्यासारखं होय! समोरच्या व्यक्तीला दुखावून मिळवण्यापेक्षा तिच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणं हा आपल्या आयुष्यात खरा आनंद घेऊन येऊ शकतो. तेव्हा, प्रेम करा, खूप प्रेम करा,

करा, अमर्याद प्रेम करा, पण त्याचा त्रास समोरच्या व्यक्तीला होणार नाही याची मात्र खबरदारी घ्या!

-स्वर्णिमा प्रकाश

# प्रेम दृष्टी

प्रेमाची व्याख्या दिवसेंदिवस बदलत चालली आहे. आपल्या मनात समोरच्या व्यक्तीबद्दल असलेल्या प्रेमाच्या भावना व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे 'valentine's day'.

प्रेम ही संकल्पना माणसाच्या आयुष्यात आनंद घेऊन येते.

संपूर्ण आयुष्य 'तो'मय होऊन जातं. त्याच्यासोबत असावं, त्याच्यासोबत जगावं, आणि त्याच्यासोबतच मरावं ; अशी ईच्छा प्रत्येकाच्या मनात असते. जगात किंवा नात्यात, जोपर्यंत प्रेम आहे, तोपर्यंत ते सुंदर आहे.

हृदयापासून घातलेली साद ही समोरच्याच्या मनात पोहोचलीच पाहिजे, ही प्रेमाची 'अट' म्हणता येईल आणि मग त्या जाणिवेतून नित्य व्यक्त होणारं प्रेम, हे शब्दातून व्यक्त करणं तितकंसं आवश्यक वाटणार देखील नाही. समोरच्या व्यक्तीच्या हृदयाचा ठाव न घेता, व्यक्त केलेल्या प्रेमात देण्याऐवजी मिळवण्याची ईच्छा अधिक असते, किंबहुना त्याही पलीकडे जाऊन जर त्या नात्यास काहीही भविष्य नसेल तर अव्यक्त प्रेमच उत्तम असतं,  असं मला वाटतं कारण जबाबदारी शिवाय घेतलेला आनंद, ही निव्वळ विकृती आहे.

प्रेमात असताना आपण कायम वेगळ्या विश्वात असल्यासारखं वाटतं. आपल्या प्रिय व्यक्तीसोबत निवांत क्षणी असताना वाटतं, की ही वेळ कधीच संपू नये कारण भावनांना, शब्द होऊन ओठांवर येण्यास मनाई असली तरी मनातलं ओळखण्याची ताकत नक्कीच आहे.

हल्लीच्या काळात 'प्रेम' ही संकल्पना न समजून घेताच आपण प्रेम करतो की काय, अशी शंका निर्माण होते कारण, सहज पाहताक्षणी प्रेमात पडणं,  हे जास्त घडताना दिसतं.

पण काय खरंच हे प्रेम असतं की फक्त आकर्षण? पण अर्थातच...सुरुवातीला झालेलं आकर्षण हे आपल्याला प्रेमात पाडण्यास भाग पाडतं.

'प्रेम' ही संकल्पना असं पाहिलं तर खूपच सोपी, आणि तसं पाहिलं तर क्लिष्ट ठरते.

ते आपल्यावर असतं, आपण प्रेमाकडे कसं पाहतो ते!

असं म्हणतात की नात्यांची मजा ती हळूहळू उलगडण्यात असते. 'प्रेम' हा शब्द विश्वास आणि त्याग, या दोन संकल्पनांशी निगडीत आहे. प्रेमात नातं हे विश्वासानं घट्ट होतं, आणि तसंच ते पुढे परिपूर्ण होत जातं.

प्रेम प्रत्येकच व्यक्ती करते, पण आपल्याला निरपेक्ष प्रेम करता यायला हवं; जसं एक आई आपल्या बाळावर त्याच्या गर्भात असल्यापासून ते तिच्या शेवटच्या श्वासापर्यंत करते. प्रेम हा कुठलाही प्रकारचा व्यवहार नसून, एक प्रकारचा आनंद आहे, एक सुखद अनुभुती आहे, ज्यात दुसऱ्याच्या आनंदात आनंदी होता यायला हवं.

स्वतःला न आवडणारी गोष्ट जेव्हा समोरच्या व्यक्तीच्या आनंदासाठी आपण हसत हसत सहन करू शकतो, तर आपण त्या व्यक्तीवर खरंच निरपेक्ष प्रेम करीत आहोत, हे नक्की! एखाद्या ठराविक कृतीवर ठराविकच प्रतिकृती घडत असते, परंतु प्रेमाच्या बाबतीत तसं नसतं कारण प्रेम हे मनातून निर्माण होतं आणि मन हे फार चंचल आहे, हे सांगायची गरज नाहीच.

एखादी व्यक्ती ठराविक परिस्थितीत जो विचार आपण करतो, तोच विचार समोरची व्यक्तीही करेल, असं नाहीये, म्हणून प्रेमात कधीही कुणाला गृहीत धरू नये.

गृहीत धरणं म्हणजे एखाद्याच्या मनाच्या स्वातंत्र्यावर ताबा घालणं होय. म्हणूनच प्रेम करा... खूप प्रेम करा... अमर्याद प्रेम करा... पण त्याचा त्रास समोरच्या व्यक्तीला दुखावून मिळवण्यापेक्षा तिच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न, हा तुमच्या आयुष्यात खरा आनंद घेऊन येऊ शकतो.

- अपूर्वा भालेराव

# तुझियासवे...

वसू आज वर्षभराने येणार म्हणून, उर्वी त्यानीच दिलेला त्याच्या आवडीचा हिरव्या रंगाचा ड्रेस घालून छान तयार झाली होती..त्याच्या स्वागताची सगळी तयारी केव्हाच करून ठेवली होती तिने, अंगणात सगळीकडे रंगीबेरंगी फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या.. घराला सुंदर सुंदर फुलांची, पिवळसर हिरव्या पानांची तोरणं लावली होती..त्याची वाट बघता बघता तिनं सहजच सभोवताली एक नजर टाकली त्यावेळी तिला जणू संपूर्ण निसर्ग त्याच्या स्वागतासाठी सज्ज असल्यासारखा भासला..

तो आला, तसं ती म्हणाली " वसू, किती रे वेळ लावलास, कधीची वाट बघतेय"

"छे, गं, वेळेत तर पोहोचलोय.." तो म्हणाला..

त्यानं जरा वेळ विश्रांती घेतली, खरोखरच त्याच्या भेटीणे सगळेच खूप सुखावलेहोते, खूप आनंदित होते, मग सगळयांच्या भेटी वगैरे झाल्यावर दोघंही फेरफटका मारायला निघाले...

त्याच्या येण्यानं तिला झालेला आनंद तिला अवती-भवती सुद्धा जाणवू लागला होता.. वातावरणात सगळीकडे उत्साह, चैतन्य जाणवत होते..

समोरच्या आंब्याच्या झाडाला आलेला मोहोर पाहून त्याने विचारलं "काय गं, चैत्र गौरीला करतात ती कैरीची डाळ आणि कैरीचे पन्हे आपणही करूयात नं.." आता तू २-३ महिने इथेच आहेस ना, तेव्हा सगळं करणारच.." ती बोलत होती.

"बघ ना ,तू आलास आणि आता चैत्राचं नवरात्र, रामनवमी, गुढीपाडवा सगळेसण एका पाठोपाठ एक सुरू होतील,आणि तुझ्या उपस्थितीत ते साजरे करणं ही खरोखरच एक सुंदर अनुभूती देणारं ठरणारंय.." तो ऐकत होता.

"ए, ऐक ना, थोडावेळ बगिच्यात जाऊयात का रे?" तिनं विचारलं

तो ही तयार झाला..

"आणि  हो जाता जाता आपल्या ठरलेल्या जागी जरा वेळ बसूया ,, किती वर्षाचं ते गुलमोहोराचं झाड अजूनही तसंच आहे, नाही..!"

आजूबाजूला कोवळी हिरवी  पानं आणि मध्ये तुरे असलेल्या लाल फुलांचे गुच्छ! आहाहाहा काय सुंदर! " तो म्हणाला ..

बोलता बोलता  केव्हा बगिच्यात जाऊन पोहोचले कळलंच नाही त्यांना..तिथलं दृश्य फारच रम्य होतं ..सगळी झाडं पाना-फुलांनी बहरली  होती.. संपूर्ण बगिच्यात जणू फुलांचा गालिचाच अंथरला होता.. संध्याकाळही झाली होती, आणि त्यावेळंचं ते दृश्य म्हणजे शब्दातही व्यक्त न करता येणारं असंच होतं..

"मगा दुपारी, विश्रांतीच्या  वेळी फार उकाडा जाणवत होता, पण आता मात्र हवेत गारवा जाणवतोय ना" तो म्हणाला..

तिनं होकारार्थी  मान हलवली..

थोडावेळ बगिच्यातल्या बाकावर दोघंही बोलत बसले.

ती म्हणाली " शाल्मली आणि  बकुळ यांना नाही का कळवलंस तू आल्याचं?"

"मी आल्याची बातमी त्यांना न सांगताच कळली असेल." तो म्हणाला.

"अरे, हो, सुमन आणि  तरू देखील तुझी वाट बघत होत्या. म्हणत होत्या की,  तो दरवेळी येताना आमच्यासाठी नवं छानंसं गिफ्ट घेऊन येत असतो. आणि ते आम्ही पुढल्या वर्षापर्यंत  तसंच जपून ठेवत असतो. तसंही त्याला भेटल्यावर मूड एकदम फ्रेश होतो. रोजच्या रूटीनला कंटाळलो असतांनाही त्याच्या भेटीनंतर पुन्हा नव्यानं जगण्याची इच्छा,त्याच्याशी बोलल्यावर नवं काहीतरी करण्याची कल्पना सुचत जाते. हूरूप येतो, उत्साह वाढतो. थकवा, कंटाळा सगळं काही कुठेतरी लांब पळालेलं असतं. " ती सांगत होती.

"खरंच कसली जादु आहे रे तुझ्यात?"

तिच्या या वाक्यावर तो ही जरासा मिश्कील हसला, जणू सगळं ठाऊक असल्यासारखा.

खरंच तू सगळयांना किती काय देतोस, तुझ्या येण्यानं सगळीकडचा उत्साह, चैतन्य, आनंद ओसंडून वाहतांना दिसतो. आयुष्यातला तोच-तो पणा ,रूक्षता जाऊन नव्यानं जगण्याची उमेद निर्माण होते...

सुखी आयुष्याचं गमक सांगून परत निघून जातोस , ती तुझी वाट पाहायला लावण्यासाठी... बरोबर ना?

नवजीवन, नवचैतन्य, देण्यापरी तू आला..

तुझियासवे वसंता हा जन्म धन्य जाहला...

- तृष्णा आंबेकर


# समारोप


“ती” चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या सख्यांचं वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते. आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.


आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

**आमचे आधीचे प्रकाशित अंक (अंक वाचण्यासाठी मुखपृष्ठावर क्लिक/टॅप करा):**


























"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# हृदयी वसंत फुलतांना...